Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume - X, Issue - I,
January - March - 2021
English / Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399 www.sjifactor.com



AJANTA PRAKASHAN

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २२. रायगड जिल्ह्यातील सुधागड व रोहा तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या लोकसंख्येची घनता व ग्रामीण वस्त्यांचे वितरणाचा भौगोलिक अभ्यास

**प्रा. सर्जेराव आनंदराव पाटील**
शेठ. ज.नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, कला आणि विज्ञान महाविद्यालय, पाली सुधागड, जि. रायगड.
**डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे**
मार्गदर्शक, भूगोल विभाग प्रमुख, बी.रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.

## १.१ प्रस्तावना

मानवी वसाहतीचे स्थान नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांशी निगडीत तर जमीन, पाणीपुरवठा, नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकांशी संबंधित आहे. ग्रामीण वसाहतीच्या स्थान निश्चितीवर प्राकृतिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांचा प्रभाव प्रामुख्याने पडत असतो. मानवाच्या पर्यावरणीय संबंधामुळे मानवी वसाहतीवर परिणाम करणारे प्राकृतिक घटक स्पष्ट होतात. हे सर्व घटक अनुकूल असल्यास ग्रामीण वसाहतीची वाढ व विकास होतो. मानवी वसाहतीच्या विकासात स्थान व स्थिती या दोन घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भूपृष्ठरचना, हवामान, सूर्यप्रकाश, पाणीपुरवठा, पर्जन्यमान, जमीन हे ग्रामीण वस्तीच्या स्थाननिश्चितीचे प्राकृतिक घटक असून या घटकांचा प्रत्यक्ष प्रभाव पडतो.

ग्रामीण वसाहतीची निर्मिती स्वयंप्रेरणेतून झाली आहे. ग्रामीण वसाहतींच्या स्थानांवर प्राकृतिक घटकांचा प्रभाव अधिक असतो हे स्पष्ट केले. उंच व सखल भूप्रदेशामुळे शेतीयोग्य जमीन व पाण्याचे साधन या भागात विभागले जाते. या विभागांना अनुसरून एकाकी घरे किंवा वसाहती निर्माण होतात. सखल व मैदानी प्रदेशात वसाहती शेतीयोग्य जमिनीच्या मध्यभागी निर्माण होतात. उंच पर्वतीय प्रदेशात किंवा शीत कटिबंधीय प्रदेशात ग्रामीण वसाहती सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेला अनुसरून स्थापन होतात. युरोपातील आल्पस् पर्वतीय प्रदेशातील वसाहतींना सूर्यापासून उष्णता मिळेल या दृष्टीनेच वसाहती निर्माण केल्या आहेत. वसाहतीच्या निर्मितीचे हे वेगळेपण दिसून येते.

## १.२ ग्रामीण वसाहतीची वैशिष्टे

१) ग्रामीण वस्ती लहान असते.
२) ग्रामीण वस्तीतील घरे लहान व एकमेकांच्या जवळ-जवळ असतात.
३) घर बांधणीसाठी माती, दगड, लाकूड, गवत, झाडाची पाने, तणस या साधनांचा वापर केला जातो.
४) ग्रामीण वस्तीमधील घरे नियोजनबद्ध पद्धतीने बांधलेली दिसत नाहीत.
५) ग्रामीण वसाहतीमधील घरांची रचना ही आरोग्यापेक्षा संरक्षणाकडे जास्त लक्ष देऊन केली जाते. त्यामुळे घरांना दारे व खिडक्या कमी असतात. काही ठिकाणी तर फक्त दारेच असतात.

Sheth J. N. P. Arts Sci. & Com. College, Sudhagad, Dist. Raigad, Est.- June-1989, Pali

## १.३ अभ्यासक्षेत्राची निवड

रायगड जिल्ह्याचा उत्तर-दक्षिण विस्तार अधिक आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागात मोठी शहरे व मुंबई महानगरीय क्षेत्राची जवळीकता आहे. दक्षिणेकडे मोठ्या नगरांचे प्रमाण कमी असून ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. रायगड जिल्ह्यात औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या लोकांची संख्या व आदिवासी लोकांची संख्या अधिक आहे. या सर्वांचा

१.८ संशोधन पद्धती

विशिष्ट क्षेत्रामध्ये किती लोकसंख्या सामावलेली आहे, याचे प्रमाण म्हणजे लोकसंख्येची घनता होय. लोकसंख्येच्या घनतेच्या आधारे लोकसंख्या वितरणाचे जास्त, मध्यम व विरळ असे तीन गटांत वर्गीकरण केले जाते. संशोधनक्षेत्रातील लोकसंख्येची घनता काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}} \times १00$$

लोकसंख्येच्या विरळ गटामध्ये १५० पेक्षा कमी घनता, मध्यम गटात १५० ते २०० घनता आणि जास्त गटामध्ये २०० पेक्षा अधिक घनतेचा समावेश आहे. लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी.ला मोजली जाते.

१.९ भूपृष्ठरचनेनुसार ग्रामीण वसाहतींचे वितरण

ग्रामीण वस्तीच्या वितरणावर परिणाम करणारा भूपृष्ठरचना हा एक महत्त्वाचा घटक आहे. भूपृष्ठाच्या उठावाचे स्वरूप म्हणजे भूपृष्ठरचना होय. भूपृष्ठरचनेला अनुसरून डोंगराळ किंवा पर्वतीय प्रदेशामध्ये तीव्र उतार, खडकाळ मृदा, खडबडीत भूपृष्ठ, शेतीयोग्य जमिनीचे कमी प्रमाण, वस्तीसाठी मर्यादित जागा, वाहतूक आणि दळणवळण सुविधांचा अभाव या वसाहतनिर्मितीमधील अडचणी अशा प्रतिकूल घटकांचा परिणाम ग्रामीण वस्तीच्या वितरणावर होतो. पर्वतीय प्रदेशाच्या तुलनते पठारी प्रदेश मानवी वस्तीसाठी अनुकूल असतो. त्यामुळे पर्वतीय प्रदेशापेक्षा पठारी प्रदेशात वस्त्यांची घनता अधिक आढळून येते. त्यामानाने पठारी प्रदेशापेक्षा मैदानी प्रदेशामध्ये सपाट भूप्रदेश, सुपीक जमीन, पाण्याची उपलब्धता, शेतीयोग्य सुपीक जमीन यामुळे मैदानी प्रदेशात वस्तीचे प्रमाण व घनत्व जास्त आढळते.

मानवी वसाहतीच्या दृष्टीने मैदानापेक्षा पठारी प्रदेश प्रतिकूल आहेत. सपाट मैदानी प्रदेश अधिक सोयीचे असतात. त्यामुळे वसाहतीतील मानवाला परस्परांशी संपर्क ठेवता येतो. मैदानात मोठ्या वसाहती निर्माण करणे शक्य होते. सुपीक जमिनीमुळे शेती, प्रक्रिया उद्योग, वाहतूक, दळणवळण या सुविधा निर्माण करता येतात. पर्वतीय प्रदेश मानवी वसाहतीला अत्यंत अयोग्य असतात. कारण दुर्गमता, तीव्र उतार, दाट जंगले, अतिवृष्टी, सुपीक जमिनीचा अभाव यामुळे पर्वतीय पर्यावरण वसाहतीस प्रतिकूल असते.

तक्ता क्र. ४.१

भूपृष्ठरचनेनुसार ग्रामीण वस्त्यांचे वितरण

(अ) सुधागड तालुका

| अ. क्र. | भौगोलिक विभाग | व्याप्त क्षेत्र चौ.कि.मी. | व्याप्त क्षेत्राची टक्केवारी | ग्रामीण वस्त्यांची संख्या | ग्रामीण वस्त्यांची टक्केवारी | ग्रामीण वस्त्याची घनता दर १०० चौ.कि.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०० पेक्षा कमी उंचीचा प्रदेश | ३९६.१३ | ८६.८ | ८३ | ८३.० | २०.९५ |
| २ | १०० ते २०० (मध्यम उंची) | ३६.११ | ७.९ | ०९ | ९.० | २४.९२ |
| ३ | २०० पेक्षा अधिक (जास्त उंचीचा प्रदेश) | २४.१४ | ५.३ | ०८ | ८.० | ३३.१४ |
| | एकूण | ४५६.३८ | १०० | १०० | १०० | २१.९१ |

घनता दर १०० चौ.कि.मी.ला २४.९२ इतकी आहे. २०० मीटर पेक्षा अधिक उंचीचा प्रदेश हा जास्त उंचीचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात ०८ (८.० टक्के) वसाहतींचा समावेश आहे. या विभागाने ४७.८६ चौ.कि.मी. (७.५ टक्के) क्षेत्र व्यापले आहे. या विभागात ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौ.कि.मी.ला ३३.१४ इतकी असल्याचे आढळून आले आहे. सुधागड तालुक्यातील १०० वस्त्यांनी ४५६.३८ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापले असून ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौ.कि.मी. ला २१.९१ इतकी आहे.

तक्ता क्र. ४.१ (ब) मध्ये रोहा तालुक्यातील भूपृष्ठरचनेनुसार ग्रामीण वस्त्यांच्या वितरणाचे अध्ययन करण्यात आले आहे. १०० मीटर पेक्षा कमी उंचीच्या प्रदेशात १२८ (७३.१ टक्के) ग्रामीण वसाहती आहेत. या विभागाने ५०९.१३ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापले असून व्याप्त क्षेत्राची टक्केवारी ७९.२ इतकी आहे. या प्रदेशात ग्रामीण वस्त्यांची घनता १०० चौ.कि.मी. ला २५.१४ इतकी आहे. १०० ते २०० मीटर उंचीच्या प्रदेशाचा समावेश मध्यम उंचीच्या गटात होतो. या प्रदेशाने ८५.७१ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापले असून त्याचे प्रमाण १३.३ टक्के आहे. या विभागात ३३ (१८.८ टक्के) वस्त्यांचा समावेश आहे. या विभागात ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौ.कि.मी. ला ३८.५० इतकी आहे. २०० मीटर पेक्षा अधिक उंचीच्या प्रदेशात १४ (८.१ टक्के) वस्त्या आहेत. जास्त उंचीच्या प्रदेशाने ४७.८६ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापले असून त्याचे प्रमाण ७.५ टक्के इतके आहे. जास्त उंचीच्या प्रदेशात ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौ.कि.मी.ला २९२५ इतकी आहे. रोहा तालुक्याचे व्याप्त क्षेत्र ६४२.७० चौ.कि.मी. असून १७५ वस्त्या आहेत. ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौ.कि.मी.ला २७.२२ इतकी आहे.

१.१० लोकसंख्येची घनता व ग्रामीण वस्त्यांचे वितरण

विशिष्ट क्षेत्रामध्ये किती लोकसंख्या सामावलेली आहे, याचे प्रमाण म्हणजे लोकसंख्येची घनता होय. लोकसंख्येच्या घनतेच्या आधारे लोकसंख्या वितरणाचे जास्त, मध्यम व विरळ असे तीन गटांत वर्गीकरण केले जाते. संशोधनक्षेत्रातील लोकसंख्येची घनता काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}} \times १००$$

लोकसंख्येच्या विरळ गटामध्ये १५० पेक्षा कमी घनता, मध्यम गटात १५० ते २०० घनता आणि जास्त गटामध्ये २०० पेक्षा अधिक घनतेचा समावेश आहे. लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी.ला मोजली जाते.

तक्ता क्र. ४.२

ग्रामीण लोकसंख्येची घनता व ग्रामीण वस्त्यांचे वितरण

(अ) सुधागड तालुका

| अ. क्र. | भौगोलिक विभाग | व्याप्त क्षेत्र चौ.कि.मी. | व्याप्त क्षेत्राची टक्केवारी | ग्रामीण वस्त्यांची संख्या | ग्रामीण वस्त्यांची टक्केवारी | ग्रामीण वस्त्याची घनता दर १०० चौ.कि.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०० पेक्षा कमी उंचीचा प्रदेश | १३२.१४ | २८.९ | १८ | १८.० | १३.६२ |
| २ | १०० ते २०० (मध्यम उंची) | १९३.०९ | ४२.३ | ३१ | ३१.० | १६.०५ |
| ३ | २०० पेक्षा अधिक (जास्त उंचीचा प्रदेश) | १३१.१५ | २९.२ | ५१ | ५१.० | ३८.९३ |
| | एकूण | ४५६.३८ | १०० | १०० | १०० | २१.९१ |

तक्ता क्र. ४.३

सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण वस्त्यांचे वितरण

(अ) सुधागड तालुका

| अ. क्र. | मंडळ | ३००० पेक्षा जास्त | २००० ते २९९९ | १००० ते १९९९ | ५०० ते ९९९ | २०० ते ४९९ | २०० पेक्षा कमी | एकूण ग्रामीण वस्त्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाली | ०१ | - | ०३ | १० | १३ | ०७ | ३४ |
| २ | जांभूळपाडा | - | ०१ | ०४ | ०८ | १३ | ०८ | ३४ |
| ३ | आंतोणे | - | - | ०३ | १८ | १० | ०१ | ३२ |
| | एकूण | ०१ | ०१ | १० | ३६ | ३६ | १६ | १०० |
| | टक्केवारी | १.० | १.० | १०.० | ३६.० | ३६.० | १६.० | १००.०० |

(ब) रोहा तालुका

| अ. क्र. | मंडळ | ३००० पेक्षा जास्त | २००० ते २९९९ | १००० ते १९९९ | ५०० ते ९९९ | २०० ते ४९९ | २०० पेक्षा कमी | एकूण ग्रामीण वस्त्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोहा | ०२ | ०५ | १३ | २१ | १० | ०३ | ५४ |
| २ | नागोठणे | ०१ | - | ०९ | १६ | १५ | ०३ | ४४ |
| ३ | चणेरा | - | - | ०४ | १६ | १० | ०२ | ३२ |
| ४ | कोलाड | ०१ | - | ११ | १६ | १६ | ०१ | ४५ |
| | एकूण | ०४ | ०५ | ३७ | ६९ | ५१ | ०९ | १७५ |
| | टक्केवारी | २.३ | २.८ | २१.२ | ३९.५ | २९.१ | ५.१ | १००.०० |

स्रोत : संशोधकाने संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित.

तक्ता क्र. ४.३ (अ) मध्ये सुधागड तालुक्यातील लोकसंख्येचे व ग्रामीण वस्त्यांचे वितरण दर्शविले आहे. ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली केवळ ०१ (१.० टक्के) वस्ती असून ती पाली मंडळात आहे. २००० ते २९९९ या दरम्यान लोकसंख्या असलेली १ (१.० टक्के) वस्ती असून ती जांभूळपाडा मंडळात आहे. १००० ते १९९९ दरम्यान लोकसंख्या असलेली १० (१०.० टक्के) वसाहती असून त्यापैकी पाली मंडळात ०३, जांभूळपाडा मंडळात ०४, आंतोणे मंडळात ०३ वस्ती आहे. ५०० ते ९९९ दरम्यान लोकसंख्या असलेल्या ३६ (३६.० टक्के) वसाहती असून पाली मंडळात १०, जांभूळपाडा ०८ आणि आंतोणे मंडळात १८ वसाहती आहेत. २०० ते ४९९ या दरम्यान लोकसंख्या असलेल्या ३६ (३६.० टक्के) वसाहती असून, त्यापैकी पाली १३, जांभूळपाडा १३, आंतोणे मंडळात १० वसाहती आहेत. २०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या १६ (१६.० टक्के) वसाहती असून त्यापैकी पाली मंडळात ०७, जांभूळपाडा मंडळात ०८, आंतोणे मंडळात ०१ असल्याचे दिसून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, सर्वाधिक लोकसंख्येच्या व सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या वसाहती अल्प असून साधारणतः २०० ते १००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या सर्वाधिक वसाहती असल्याचे आढळून आले आहे.

तक्ता क्र. ४.३ (ब) मध्ये रोहा तालुक्यातील लोकसंख्येचे व ग्रामीण वस्त्यांचे वितरण यांचे अध्ययन करण्यात आले आहे. रोहा तालुक्यात ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ०४ (२.३ टक्के) वस्त्या असून, त्यापैकी रोहा मंडळात ०२, नागोठणे ०१, कोलाड मंडळात ०१ वस्ती आहे. २००० ते २९९९ लोकसंख्या असलेल्या ०५ (२.८ टक्के) वसाहती असून त्यापैकी सर्व रोहा मंडळातील आहेत. १००० ते १९९९ लोकसंख्या असलेल्या ३७ (२१.२ टक्के) वसाहती असून त्यापैकी रोहा मंडळात १३, नागोठणे

संदर्भ ग्रंथ

1. Kohn C.F. (1954), Settlement Geography, Published in American Geography, Inventory and Prospect edited by James, P.E. Jones C.F. Page No. 138.
2. Mandal R.B. (1978), Introduction to Rural Settlement, Concept Publishing
३. Blache Vidal-de La (1962), Principal of Human Geography, Page No. 316.
४. आगलावे प्रदीप (प्रथमावृत्ती, जानेवारी २०००), 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, रुईकर मार्ग, नागपूर.
५. अहीरराव, वा. र. (१९९७), 'अधिवास भूविज्ञान', निराली प्रकाशन, पुणे, पा. नं. १ ते ९.
६. घारपुरे, व्ही.टी. (२००१), 'वस्ती भूगोल', पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पान नं. ८